Student and faculty participate in bhartiy chatra sansad 8 in pune : 9 jan to 21 jan 2018







Principal
Appasaheb R.B.Garud Art's
Commerce & Science College
Shendurni-424204,Tal.Jamner



Student and faculty participate in bhartiy chatra sansad 8 in pune jan 2018










Principal
Appasaheb R.B.Garud Art's
Commerce & Science College
Shendurni-424204,Tal.Jamner

A.R.B.Garud Arts,Com. & Sci.College
SENIOR
Shendurni Tal Jamner

21 Jan 2018 एकदिवसीय कार्यशाला

# शेंदुर्णीच्या गरुड महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात

तरुण भारत



तभा वृत्तसेवा
शेंदुर्णी, २२ जानेवारी

अप्पासाहेब रघुनाथराव भाऊराव गरुड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय विद्यार्थिनी व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा नुकतीच उत्साहात संपन्न झाली.

'विद्यार्थिनी व्यक्तिमत्त्व विकास व सक्षमता' या विषयावर युवती सभा झाली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. वासुदेव पाटील तर प्रमुख मान्यवर दर्शना पवार, साने गुरुजी स्मारक कार्यवाहक अमळनेर होत्या. कार्यक्रमाला शेंदुर्णी व एरंडोल महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यशाळा दोन सत्रात घेण्यात आली. प्रथम सत्रात 'स्त्री-पुरुष समता व एकता काळाची गरज' या विषयावर व्याख्यान झाले. द्वितीय सत्रात अॅड. प्रसन्न फासे यांचे 'महिलांविषयक कायदे व महिला सुरक्षितता' या विषयावर व्याख्यान झाले. कार्यशाळेस प्रा.डॉ. वसंत पतंगे व प्रा.डॉ. एस.जी. देहरकर यांचे सहकार्य लाभले. उपप्राचार्य प्राध्यापक एन. एस. सावळे, प्रा. अमर ज. डॉ. संजय भोळे, प्रा. डॉ. दिनेश पाटील, प्रा. अप्पा महाजन, प्रा. प्रमोद सोनवणे, प्रा. वर्षा लोखंडे, प्रा. वर्षा पवार, प्रा. सुमन निकम उपस्थित होते.

प्रास्ताविक प्रा. डॉ. सुजाता पाटील यांनी सूत्रसंचालन सुमिता पाटील व प्रतीक्षा गुजर यांनी केले. आभार प्रा.डॉ. योगिता चौधरी यांनी मानले.

Principal
Appasaheb R.B.Garud Art's
Commerce & Science College
Shendurni-424204,Tal.Jamner

A.R.B.Garud Arts,Com & Sci.College
SENIOR
Shendurni Tal Jamner

१६ ऑक्टोबर २०१८

१४ फेब्रुवारी २०१९

# शेंदुर्णी येथील गरूड महाविद्यालयात सीबीसीएस कार्यशाळा उत्साहात

## ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे हित : संजय गरूड यांचे प्रतिपादन

। शेंदुर्णी । प्रतिनिधी

जनशक्ति 17 Oct 2018

येथील अप्पासाहेब र. भा. गरूड महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची इंग्रजी विषयाची निवड आधारीत मूल्यांकन प्रणाली सीबीसीएस कार्यशाळा मान्यवर व तज्ञांच्या उपस्थितीत पार पडली. विद्यापीठाने सीबीसीएसचा स्वीकार केल्यानंतर शिक्षक व विद्यार्थी संघटनांनी तात्वीक व धोरणात्मक विरोध या पूर्वी केलेला आहे. परंतु याच कार्यकाळात नवीन अभ्यास मंडळाची रचना झाली त्यांनी शिवधनुष्य पेलत अभ्यास क्रमातील बदल तसेच नवीन मूल्यांकन प्रकीया या दोन्ही घटकांना यथायोग्य न्याय दिल्याचे दिसून येते, असे मत यावेळी व्यक्त झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष संजय गरुड होते, अभ्याक्रमात बदल घडवित असताना ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे हित जोपासले जावे, असे ते म्हणाले.

## अभ्यासक्रमाबाबत मांडली भूमिका



» कार्यशाळेचे उद्घाटन इंग्रजी अभ्यास मंडळ अध्यक्षा प्रा. डॉ. मुक्ता महाजन यांनी केले. प्राचार्य डॉ. ए. पी खैरनार, क. ब. चौ. उमवि व्यवस्थापन परीषद सदस्य प्रा. नितिन बारी, दी शेंदूर्णी सेकेंडरी सोसायटीचे सचिव सागरम लजैन उपस्थित होते. प्रास्ताविक उपप्राचार्य एन. एस. सावळे, सूत्रसंचालन डॉ सुजाता पाटील व डॉ योगीता चौधरी तर आभार प्रा भूषण पाटील यांनी मानले. दुपारच्या सत्रात डॉ स्मिता चौधरी मुसावळ, डॉ अविनाश बडगुजर, वरणगाव, प्रा. नितीन पाटील, प्रताप कॉलेज अमळनेर यांनी मते मांडली. समारोप सत्रात डॉ. एस. पी. झनके यांनी एकंदरीत कार्यशाळेतील चर्चेतील फलीते मांडलीत. डॉ. अविनाश बडगुजर यांनी रोजगार क्षम अभ्यासक्रमांबाबत भूमिका मांडली. प्राचार्य डॉ. वासुदेव आर.पाटील व्यासपीठावर उपस्थित होते. वाचन प्रेरणादिना निमित्त शेंदूर्णीत वृत्तपत्र घरोघरी पोच करणाऱ्या सुनील कासार, कमलाकर सुतार,विजय जैन,योगेश कासार व ग्रंथालय सेवक मोहन पाटील यांचा सत्कार करण्यात आला. तसेच शिबा खान, क्षमा फेंडगे, डॉ. शरद पाटील यांना गौरविण्यात आले. याप्रसंगी डॉ बच्छाव, साक्री, डॉ. बोरसे-धरणगाव, प्रा.लिलाधर पाटील, प्रा. जितेंद्र पाटील - अमळनेर, प्रा चव्हाण - नवापुर व प्राध्यापक, जिल्हा विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा पवन पाटील - मारवड,विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यशाळेचे आयोजक प्रा. दिनेश पाटील यांनी आभार प्रगट केले.

# गरुड महाविद्यालयात राष्ट्रीय इतिहास परीषदेचे आयोजन

शेंदुर्णी । प्रतिनिधी

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ व गरुड महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय इतिहास परीषदेचे आयोजन दि.१४ रोजी करण्यात आलेले आहे. इतिहास संशोधनात स्थानीक इतिहासाला विशेष महत्व आहे. हाच प्रमुख उद्देश बाळगुन या आशयाच्या देशभरातील सुमारे १०० शोध निबंधांचे सादरीकरण, चर्चा व प्रकाशन दिवसभरात स्वतंत्र सत्रांमध्ये होणार आहे . विशेष आकर्षण म्हणजे जेष्ठ स्वा. सै. श्री. उत्तमराव देसले (वय८६)वडाळी ता. चाळीसगाव हे १९४२ चा कट मांडणार आहेत. विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या 'माझा गाव माझा इतिहास' या संशोधन ग्रंथाचे प्रकाशन केले जाणार आहे. सुरेश पांडे 'अजिंठा लेणीतील ब्राम्ही शिलालेखांचे पुनः वाचन करणार आहेत. जेष्ठ इतिहास संशोधक शरदचंद्र नेमाडे निंबोरा ता.यावलचा इतिहास परीषदेत मांडणार आहेत. तर राजु भुईकर संकलित तोंडापूर येथील प्राचीन स्थापत्याचा उत्कृष्ठ अविष्कार असलेली 'बारव' चे सचित्र प्रकाशन करण्यात येणार आहे.

या परीषदेत क.ब.चौ. उ.म. वि.चे कुलसचिव डॉ. बी. बी. पाटील, प्राचार्य डॉ.बी.एन. पाटील, प्रा. डॉ. डी. एन. वाघ डॉ. अल्काजिन तुस्कानो , डॉ. अशोक रानडे उपस्थित राहणार आहेत. उपस्थित राहण्याचे आवाहन धी. शेंदुर्णी सेकंडरी एज्युकेशन को-ऑप. लि. संस्थेचे अध्यक्ष मा. दादासो. संजय राव गरुड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. आर. पाटील, परीषदेचे सचिव डॉ. प्रशांत देशमुख यांनी केले आहे.

Principal
Appasaheb R.B.Garud Art's
Commerce & Science College
Shendurni-424204,Tal.Jamner

A.R.B.Garud Arts,Com. & Sci.College
SENIOR
Shendurni Tal Jamner

# गरूड महाविद्यालयात विविध कार्यशाळांचे आज आयोजन

तभा वृत्तसेवा
शेंदुर्णी, ता.जामनेर

येथील गरुड महाविद्यालयात प्राचार्य डॉ. वासुदेव आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार ६ पासून विविध कार्यशाळांचे आयोजन करण्यात येत आहे.



यामध्ये ६ रोजी One day state lavel workshop on role of IQSC in revised NC acreditation या विषयावर महाविद्यालयात होणाऱ्या NC मूल्यांकनासंदर्भात कार्यशाळा आयोजित केली आहे. या कार्यशाळेसाठी संसाधन व्यक्ती म्हणून डॉ. निर्मला पद्मावत नूतन महाविद्यालय सेलू आणि डॉ.भारत शिंदे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. गुरुवार ७ रोजी Implementation and effects of E-Governce and office automation या एकदिवसीय सेमीनारचे आयोजन कार्यालयीन कामकाजाचे NC मध्ये महत्त्व या संदर्भात करण्यात आले आहे.

यासाठी संसाधन व्यक्ती म्हणून डॉ.किया मुखर्जी ऑफिस सुप्रिटेंड माणिबेन नानावटी महाविद्यालय मुंबई यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. १३ रोजी implementation and Effect's of Good's and Service tax on Indian economy, या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन GST कराचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम यासंदर्भात आयोजित केली आहे.

परिषदेसाठी प्रमुख अतिथी उद्घाटक फैजपूर डी. एन.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.आर. चौधरी, ओरिसा येथील डॉ.सभद डीगल हे संसाधन व्यक्ती म्हणून लाभणार आहेत. १४ रोजी इतिहास संशोधन: नवप्रवाह या विषयांवर मान्यवर मार्गदर्शक मार्गदर्शन करणार आहेत.

या परिषदेसाठी डॉ. अरुणचंद्र पाठक हे संसाधन व्यक्ती म्हणून लाभणार आहे. या परिषदेत प्रामुख्याने खान्देशातील विविध ऐतिहासिक घटकांसंदर्भात चर्चा आणि शोधनिबंध सादर केले जाणार आहे.

परिषदेमध्ये विद्यार्थ्यांना तसेच संशोधक यांना आपले पोस्टर प्रदर्शन करण्याची संधी मिळणार आहे. चारही कार्यशाळांमध्ये सहभागी होण्याचे अवाहन प्राचार्य डॉ. वासुदेव आर. पाटील तसेच आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

तरुण भारत - 9/2/19

# गरुड महाविद्यालयात ई-गव्हर्नन्स ऑटोमेशन कार्यशाळा

तभा वृत्तसेवा
शेदुर्णी,ता.जामनेर, ८ फेब्रुवारी

येथील गरुड महाविद्यालयात ई-गव्हर्नन्स व ऑफिस ऑटोमेशन कार्यशाळा पार पडली. याप्रसंगी दी शेदुर्णी सेकं. एज्यु. सोसा.च्यावतीने भगवान वेडू तायडे, मुख्य लिपीक पी. ओ. नहाटा महाविद्यालय, भुसावळ यांना मानपत्र देवून गौरविण्यात आले. मानपत्राचे वाचन डॉ. आर. डी. गवारे यांनी केले. प्रास्ताविकात डॉ. ए. एन. जिवरग यांनी कार्यशाळेची उद्दिष्टे विषद केली. ज्ञान, विचार व संघटनात भगवान तायडे जेष्ठच असे मत शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे महासचिव रावसाहेब त्रिभुवन यांनी व्यक्त केले.

संस्थेचे जेष्ठ संचालक यु. यु. पाटील यांनी शिक्षकेतर कर्मचारी शिक्षण क्षेत्राचा कणा असला तरी त्यांच्या पदरी उपेक्षा पडते, असे सांगितले. संस्थेचे सचिव मा. सागरमलजी जैन यांनी अध्यक्षीय भाषणातून संस्थेच्या वतीने ऋणभावना व्यक्त केली. सूत्रसंचालन डॉ आर. डी. गवारे व डॉ. सुजाता पाटील यांनी केले. आभार प्रा.पी.जे. सोनवणे यांनी मानले. उदघाटकीय मनोगतात य.ना.चव्हाण महाविद्यालय, चाळीसगावचे प्राचार्य डॉ.एस.आर.जाधव यांनी कार्यशाळेचे उद्घाटन झाल्याचे घोषित केले. किया मुखर्जी, नानावटी महाविद्यालय यांनी शेंदुर्णीसारख्या दुर्गम, रिमोट एरियात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी लढा देत असल्याचे पाहून आनंद झाल्याचे सांगितले. याप्रसंगी व्यासपीठावर दिपक गरुड, उपप्राचार्य प्रा. एन. एस. सावळे, उपप्राचार्य प्रा. आर. जी. पाटील, सयाजीराव पाटील कापडणेकर, पत्रकार डॉ. दिपक जाधव, उपप्राचार्य डॉ. संजय भोळे, डॉ. शाम साळुंखे, का. अ. सतिष बाविस्कर, मुख्य लिपीक हितेंद्र गरूड, प्रा. अमर जावळे, डॉ. प्रशांत देशमुख , डॉ .दिनेश पाटील,प्रा.डी. एच धारगावे, प्रा .ए.एस. महाजन, प्रा .एस.जी. डेहरकर, प्रा. संदिप कुंभार, प्रा. निलेश बारी प्रा रीना पाटील, प्रा. छाया पाटील, प्रा. संदिप द्राक्षे, प्रा. भूषण पाटील, सुधीर गरूड, संभाजी सोनवणे, लक्ष्मण सोनवणे, बशरत तडवी, पंकज जैन, राजेंद्र सदानशिव उपस्थित होते. पहिल्या सत्रात मिलिंद मानसुटे यांनी मास्टर सॉफ्ट, नागपूर या कंपनीने विकसित केलेल्या 'मास्टर सॉफ्ट' या सॉफ्टवेअरची ओळख व प्रात्यक्षिक उपस्थितांना दाखविले. समारोप सत्रात भगवान तायडे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. वासुदेव आर. पाटील होते. समन्वयक सतीष बाविस्कर व हितेंद्र गरूड, उपप्राचा[र्य] डॉ. शाम साळुंखे, समन्वयक डॉ. [ए.] एन. जिवरग उपस्थित होते. आभ[ार] उपप्राचार्य डॉ. शाम साळुंखे या[ंनी] मानले.



**हा तर संस्थेचा सन्मान....**
सत्काराला उत्तर देतांना मुख्य लिपीक भगवान तायडे म्हणाले की, हा सन्मान माझा एकट्याचा नसून माझी संस्था, माझ्या महाविद्यालयाचा हा सन्मान आहे.

A.R.B.Garud Arts,Com & Sci.College SENIOR Shendurni Tal Jamner

Principal
Appasaheb R.B.Garud Art's
Commerce & Science College
Shendurni-424204,Tal.Jamner

# तरुणींनी संघटित होऊन प्रश्न सोडवावेत

## कल्पिता पाटील : शेंदुर्णी येथे गरुड महाविद्यालयात युवतींची आढावा बैठक

सकाळ वृत्तसेवा

शेंदुर्णी (ता. जामनेर), ता. ४ : ग्रामीण भागातील मुलींना अनेक प्रश्न भेडसावत असतात या प्रश्नांची उत्तरे आपण संघटित होऊन शोधू शकतो, असे प्रतिपादन राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा कल्पिता पाटील यांनी केले.

येथील महाविद्यालयाच्या 'ती'ची गरुडझेप मंचअंतर्गत तक्रार निवारण समिती आणि राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या संयुक्त विद्यमाने युवतींची आढावा बैठक पार पडली, त्यावेळी त्या बोलत होत्या.

### विद्यार्थिनींशी हितगूज

विद्यार्थिनींची केलेल्या या हितगूज कार्यक्रमास मीनल पाटील, सागरमल जैन, सुधाकर बारी, शांताराम गुजर, पंचायत समिती सदस्य डॉ. किरण सूर्यवंशी, राजेंद्र पाटील, सागर कुमावत, शैलेंद्र पाटील, विनोद माळी, विशाल पाटील, नबी शहा, शकूर शहा, अविनाश निकम, डॉ. विजय राठोड, डॉ. अतुल पाटील, रवींद्र गुजर, विलास शुक्ला, दीपक जाधव, प्राचार्य शिंपी, प्राचार्य डॉ. व्ही. आर. पाटील व मोठ्या संख्येने युवती उपस्थित होत्या. डॉ. योगिता चौधरी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. संजय भोळे यांनी प्रास्ताविक केले.



**शेंदुर्णी (ता. जामनेर) : गरुड महाविद्यालयात मार्गदर्शन करताना कल्पिता पाटील. व्यासपीठावर संजय गरुड, मीनल पाटील, सागरमल जैन, डॉ. किरण सूर्यवंशी आदी.**

### कागदी पिशवीचे अनावरण

पर्यावरण संवर्धनासाठी पर्यावरणपूरक कागदी पिशव्या वापरण्याचा संदेश देण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते कागदी पिशवीचे अनावरण केले. संजय गरुड यांनी अध्यक्षस्थानावरून महिलांना व युवतींना कुणीही कमी लेखू नये, तसेच त्यांना असणाऱ्या समस्यांचा व त्यावरील उपायांचा सखोल ऊहापोह केला.

A.R.B.Garud Arts,Com & Sci.College SENIOR Shendurni Tal Jamner

Principal
Appasaheb R.B.Garud Art's
Commerce & Science College
Shendurni-424204,Tal.Jamner